मराठावाडा विकास कार्यक्रमांतर्गत मराठावाडा विभागात
मत्स्यव्यवसाय विकासाच्या योजनांना मान्यता देणे
व निधी वितरीत करणेबाबत सन २००९-१०

# महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. मत्स्यवि २४०९/प्र.क्र.१५३/पदुम-१३,
मंत्रालय विस्तार, मुंबई — ४०००३२
दिनांक : ३१ मार्च, २०१०

संदर्भ :-
१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि — २४०७/प्र.क्र.१९२, पदुम-१३, दि. १५.१.२००८
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि — २४०८/प्र.क्र.१४२, पदुम-१३, दि. १५.९.२००८
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि — २४०८/प्र.क्र.१४२, पदुम-१३, दि. ८.१०.२००८
४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि — २४०८/प्र.क्र.१५४, पदुम-१३, दि. २४.१०.२००८
५) शासन शुध्दीपत्र क्रमांक-कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि- २४०८/प्र.क्र.१४२, पदुम-१३, दि. १५.१२.२००८
६) शासन निर्णय, क्रमांक कृषि व पदुम विभाग, क्रमांक - मत्स्यवि - २४०९/प्र.क्र.१५३, पदुम-१३, दि. ९.११.२००९

**प्रस्तावना:-**

मराठवाडा हा मागास भाग असून राज्यातील इतर भागासमवेत मराठावाडयाचा देखिल विकास होण्याच्या दृष्टिने मराठवाडयातील कृषि संलग्न क्षेत्राचा विकास दर ६ टक्के नेण्याचे उद्दिष्ठ ११ व्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेले आहे. या करिता मत्स्यव्यवसाय विकासासाठी मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण, मत्स्यबीज संचयन, झिंगाबीज संचयन, मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण,

मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देणे आदि योजना सन २००८-०९ व २००९-१० या दोन आर्थिक वर्षात राबविण्यास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय, दिनांक १५.१.२००८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

**शासन निर्णयः-**

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यवि २४०९/प्र.क्र.१५३/पदुम-१३ दि ९.११.२००९ या द्वारे रद्द करण्यात येत असून मच्छिमारांचे विकासासाठी मराठवाडा पॅकेज अंतर्गत सन २००९-१० या आर्थिक वर्षात खालील योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) **मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण** – मराठवाडा विभागातील ६ मत्स्यबीज केंद्रांचे बळकटीकरण करणे आवश्यक असून या केंद्राची संचयन व संवर्धन, तलावांची दुरुस्ती , गाळ काढणे, पाईप लाईन दुरुस्ती, वर्तुळाकार हॅचरीची दुरुस्ती इ. कामांसाठी एकूण रु. ४६.३० लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून सदर रक्कम B.D.S. वर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून यासाठी होणारा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशिर्ष मागणी क्र.एच-८, ४४०५- मत्स्यव्यवसाय भांडवली खर्च, १०१ केंद्र भूजल मत्स्यव्यवसाय, (दोन)(एक) मत्स्यबीज क्षेत्र मोठी/लहान बांधकामे (४४०५ ००१४) खाली सन २००८-०९ मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

२) **मत्स्यबीज संचयन** :- मराठवाडा विभागातील उपलब्ध इष्टतम मत्स्यबीज संचयनासाठी एकूण इष्टतम मत्स्यबीज संचयनापैकी प्रथम ५०% संचयन मत्स्य विभागामार्फत करण्याचे प्रस्तावित असून यासाठी रुपये ६०.०० लक्ष तरतूद करण्यात आली असून सदर रक्कम B.D.S. वर उपलब्ध करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष २४०५-मत्स्यव्यवसाय १०१ भूजल मत्स्यव्यवसाय, (०२) (०२) अवरुध्द पाण्यात मत्स्यसंवर्धन, राज्य योजनांतर्गत योजना, २१ सामुग्री व पुरवठा (२४०५ ०१३७) या लेखाशिर्षातंर्गत मंजूर तरतूदी मधून करण्यात यावा. व हा निधी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्याकडे सुपूर्द करावा.

३) **झिंगाबीज संचयन**:- गोडया पाण्यातील झिंग्यास जास्त मागणी व जास्त दर मिळत असल्याने झिंगा उत्पादनास चालना देण्यासाठी रु ३२०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून सदर रक्कम B.D.S. दर उपलब्ध करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र.डी-६ २४०५ - मत्स्यव्यवसाय १०१ भूजल मत्स्यव्यवसाय (०२) (०२) अवरुध्द पाण्यात मत्स्यसंवर्धन राज्य योजनांतर्गत योजना, २१ सामुग्री व पुरवठा (२४०५ ०१३७) या लेखाशिर्षातंर्गत मंजूर तरतूदी मधून करण्यात यावा. व हा निधी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्याकडे सुपूर्द करावा.

या योजनेतर्गत मत्स्य/ झिंगाबीजाचा पुरवठा महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येणार असून मत्स्य/ झिंगाबीज संदर्भात खालीलप्रमाणे खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई, | अध्यक्ष. |
| उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य. |
| उप सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य. |
| प्रादेशिक उप आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, औरंगाबाद | सदस्य. |
| उप सचिव, मत्स्यव्यवसाय, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

या योजनेंतर्गत निश्चित केलेल्या उद्दिष्ठांमध्ये व तरतूदीत कोणताही बदल करण्यात येणार नाही. महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाने मत्स्य/झिंगाबीज संचयन योजनेंतर्गत सन २००९-१० मध्ये उपलब्ध तरतूदीमध्येच खर्च करण्याची दक्षता घ्यावी. तसेच या योजनेंतर्गत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई यांनी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचेशी विचारविनिमय करुन एक कृती आराखडा (Plan of action) तयार करावा व हा कृती आराखडा राबविण्यासाठी ऑपरेशन गाईडलाईन्स तयार करुन शासनाची मान्यता घ्यावी. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांनी या प्रकल्पाचा प्रगती अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा. या कार्यक्रमातून मराठवाडयात मत्स्योत्पादन वाढविण्यासाठी कसोशिने प्रयत्न करावा.

४) **मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधाः-** मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांनी पकडलेली मासळी त्वरीत जवळच्या बाजारात विक्रीसाठी नेणे व संस्करण केंद्रावर पोहोचविण्यासाठी संस्थेच्या क्रियाशील मच्छिमारांना सायकली व शीतपेटया देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रु. ४८.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून सदर रक्कम B.D.S. वर उपलब्ध करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र. डी — ६, २४०५ - मत्स्यव्यवसाय, १२० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था (०२)(०४) मासळीचे सुरक्षण, वाहतूक व विक्री, ३३ अर्थसहाय्य (२४०५ ०३७१) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर तरतूदी मधून करण्यात यावा.

५) **मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरणः-** या योजनेसंदर्भात स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

मराठवाडा विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी खरेदी, अंमलबजावणी व संनियंत्रण अशा तीन समित्या शासन निर्णय, दिनांक ८.१०.२००८ अन्वये नियुक्त करण्यात आल्या होत्या. त्यापैकी खरेदी समिती, सचिव (पदुम) यांच्या दि. २४.१२.२००८ च्या पत्रान्वये बरखास्त करण्यात आली आहे. त्यामुळे आता या कार्यक्रमांतर्गत करावयाची साहित्य खरेदी शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक - मत्स्यवि-२४०३/प्र.क्र.१८३/पदुम-१३, दि. २८.६.२००५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या खरेदी समितीमार्फत करण्यात यावी.

तसेच प्रादेशिक उपआयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे नवीन संनियंत्रण अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक उप आयुक्त, मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद | अध्यक्ष |
| २ | महसूल विभागाचा अधिकारी (तालुका स्तरावरील नायब तहसिलदार) | सदस्य |
| ३ | पाटबंधारे विभागाचा अधिकारी (उप अभियंता/कनिष्ट अभियंता) | सदस्य |
| ४ | संबंधित गावचा सरपंच/उपसरपंच | सदस्य |
| ५ | संबंधित ठेकेदार संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संबंधित जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ७ | संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) | सदस्य सचिव |

या पॅकेजअंतर्गत मंजूर निधी कोषागारातून काढणे व वितरित करणे, यासाठी सहाय्यक संचालक, (वित्त) आयुक्त कार्यालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून मान्यता

देण्यात येत आहे. तसेच योजनेंतर्गत प्राप्त निधी शासन निर्णय दि. ३१.३.२०१० अन्वये मान्यता दिल्यानुसार P.L.A. खात्यात जमा करण्यात यावा.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक म्हणून प्रादेशिक उपआयुक्त, मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून आयुक्त (मत्स्य), मुंबई यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच अनुदान वाटप व्यवस्थित करण्याची व उपलब्ध निधीच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी प्रादेशिक उप आयुक्त, मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद यांची राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(प. श. अहमद)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन,**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, औरंगाबाद
विभागीय आयुक्त, औरंगाबाद, लातूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२/वित्त विभाग, मंत्रालय-३२/ निवड नस्ती.